MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक - दिपक थोरात

| बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०१ | अंक -२८५ | सोमवार दि.०८ जुलै २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -285 | MONDAY DT. 08 JULY 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4 |

## महाराष्ट्राला 'सर्वोत्कृष्ट कृषी राज्य' पुरस्कार!

मुंबई (प्रतिनिधी)

माजी सरन्यायाधीश, केरळचे राज्यपाल न्यायमूर्ती पी. सथाशिवम यांच्यासह १५ जणांच्या अध्यक्षतेखालील कृषी नेतृत्व पुरस्कार समितीने महाराष्ट्र राज्याला २०२४ सालचा 'सर्वोत्कृष्ट कृषी राज्य' पुरस्कार देण्याची घोषणा केली आहे. येत्या ११ जुलै रोजी दिल्लीतील हॉटेल हॉलिडे इन मध्ये १५ व्या 'एग्रीकल्चर लीडरशिप कोन्क्लेव्ह'मध्ये या पुरस्काराचे वितरण केले जाणार असून राज्य सरकारच्या वतीने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच कृषिमंत्री धनंजय मुंडे हा पुरस्कार स्वीकारणार आहेत. एग्रीकल्चर टुडे च्या वतीने या पुरस्काराची सुरुवात २००८ सालापासून करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र शासनाने मागील वर्षात पर्यावरणाच्या संरक्षणासह अन्नसुरक्षा, सर्वात मोठी बांबू लागवड, तृणधान्य अभियान, औष्णिक वीज निर्मितीत बायोमास चा वापर यांसारखे अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम राबवले असून १.७ दशलक्ष हेक्टर क्षेत्राचे १२३ मेगा सिंचन प्रकल्प, पंतप्रधान किसान सन्मान निधी दुप्पट करणारे देशातील पहिले राज्य, त्याचबरोबर ४.६३ लाख शेतकऱ्यांना नॅनो युरिया व नॅनो डीएपी खतांचे वितरण, सूक्ष्म बाजरी कार्यक्रम, डाळींच्या उत्पादनात देशात अव्वल स्थान, तसेच एक रुपयात पिक विमा योजना राबवणारे देशातील एकमेव राज्य असे अनेक उपक्रम यशस्वीरित्या राबवले आहेत. यामुळे लाखो शेतकऱ्यांवर सकारात्मक परिणाम झाला असून ग्रामीण कृषी क्षेत्रातील समृद्धीला लक्षणीय चालना मिळाली असल्याचे पुरस्कार समितीचे निष्कर्ष आहेत.

# राज्यकर्त्यांनो मुसलमानांचे मत घेताना बरं वाटतंय का?

## पालकमंत्री धनंजय मुंडे खा.बजरंग सोनवणेना माहीत नाही का दिंद्रुड मधील दफनविधी रोखलेला

माजलगाव ।प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील कब्रस्तानच्या जागेचे गॅजेट असुन सातबारासह वक्फ बोर्डातही त्याची नोंद आहे. जवळपास १३०० वर्षांपासून त्या जागी कब्रस्तान असतांनाही तेथील तहसील आणि पोलीस प्रशासनाने धर्मगुरू (आमीर साहाब) यांचा दफनविधी रोखल्याने दिंद्रुडमध्ये तणावसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. प्रशासनाने अचानक दफनविधी का रोखला ? असा प्रश्न उपस्थित करत संतप्त जमावाने मृतदेह माजलगाव येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर आणून ठेवला. दुपारी उशिरापर्यंत मृतदेह एसडीएम ऑफीसमोरच ठेवण्यात आला होता. संतप्त जमावाकडून प्रशासनाविरूध्द जोरदार घोषणाबाजी सुरू होती. दरम्यान दिंद्रुड येथील बाजारतळा लगत असलेल्या कब्रस्तानच्या जागेचे प्रकरण हायकोर्टात सुरू आहे. शेकडो वर्षांपासून त्या जागेत कब्रस्तान असुन त्या जागेत शेकडो कबरी आहेत असे असतांना पोलीस प्रशासनाने तहसीलचे आदेश असल्याचे सांगून दफनविधी रोखल्याने संताप व्यक्त होवू लागला आहे.





### तहसीलदारांनी एक महिन्यापुर्वीच बैठक घेतली होती, तरीही दफनविधी रोखला

माजलगावच्या तहसीलदार मॅडम यांनी दिंद्रुड येथील बाजारतळ आणि कब्रस्तानच्या जागेच्या अनुषंगाने समाज बांधवांची बैठक घेतली होती. सदरील जागेच्या प्रकरणात न्यायालयाचा निर्णय येईपर्यंत या जागेवर बाजारही भरवला जाईल आणि दफनविधीही करण्यात येईल असे सांगितले होते. मात्र आज अचानक दफनविधी रोखल्याने संताप व्यक्त वू लागला आहे. कसल्याही प्रकारची नोटीस किवा पुर्वसूचना न देता ऐन दफनविधीच्या वेळीच प्रशासनाने ही भूमिका घेतल्याने संताप व्यक्त होत असून या प्रश्नी जिल्हाधिकारी आणि एसपी साहेबांनी तात्काळ लक्ष घालावे अशी मागणी होवू लागली आहे.

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील आमीर साहाब शेख सुलेमान हे गेल्या काही दिवसांपासून आजारी होते. आज पहाटे त्यांचे निधन झाले. मृत्यूसमयी ते ८० वर्षांचे होते. नेहमीप्रमाणे आज सकाळी दिंद्रुड बाजार तळालगत असलेल्या कब्रस्तानमध्ये त्यांच्या दफनविधीसाठी कबर खोदण्यात आली होती. त्याच ठिकाणी त्यांचा दफनविधी करण्यात येणार होता. ऐनवेळी दिंद्रुड पोलीसांनी त्याठिकाणी दफनविधी करण्यापासून समाज बांधवांना रोखले. त्यामुळे बराचवेळ तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती. तहसीलदारांच्या आदेशावरून या ठिकाणी दफनविधी करता येणार नाही अशी भुमिका पोलीसांनी घेतली.

## दिंदुडमध्ये दफनविधी रोखल्याने तणाव

**मृतदेह माजलगाव एसडीएम ऑफिससमोर आणून ठेवला; शेकडो वर्षांपासून त्याच जागी आहे कब्रस्तान. तहसिलदारांसह पोलिसांविरुध्द संताप; जिल्हाधिकारी, एसपी साहेबांनी तात्काळ लक्ष घालावे.**

मात्र त्या भुमिकेला मुस्लीम समाजाने विरोध करत ही जागा कब्रस्तानचीच आहे. त्याची गॅजेटमध्ये नोंद असुन वक्फ बोर्डातही कब्रस्तानचे पुरावे आहेत असे असतांनाही ऐनवेळी दफनविधी का रोखता ? असा प्रश्न उपस्थित करत संतप्त समाज बांधवांनी आमीर साहेबांचा मृतदेह माजलगाव येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयाच्या गेटवर आणून ठेवला. यावेळी प्रशासनाच्या विरूध्द जोरदार न घोषणाबाजीही करण्यात आली.




बीड जिल्ह्याच्या राजकारणामध्ये आज सुद्धा मुस्लिमांसह माझ्या स्वर्ग यांचे मताचे राजकारण करून मुस्लिम दलित समाजाच्या नेत्यांना राजकारण करत बीड जिल्ह्यातील नेते आपली राजकारणाची पोळी भाजून घेतात यामध्ये काही नेते समाजाला विकण्याची परंपरा चालू ठेवत आपल्या खिशामध्ये कसे पैसे जातील हे पाहत आहेत परंतु मुस्लिम समाजाचे मत हे २०२४ मध्ये निर्णय झाले यामध्ये मांग महार मुसलमानी भरभरून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे उमेदवार असलेले विद्यमान खासदार नवनिर्वाचित म्हणून मिळवणारे बजरंग सोनवणे यांना मुस्लिम मांग महार या जाती धर्मातील लोकांनी मत केली. नमता मुस्लिम समाजाने मतदान केले आज सुद्धा बजरंग सोनवणे यांनी पाठ फिरवली आहे याचाच एक भाग म्हणून आज दिंद्रुड येथे दफन विधीच्या मुद्द्यावरून काही समाजकंटकांनी दफनविधी येथे करू नका म्हणून अडवला परंतु अनेक वर्षांपासून त्या ठिकाणी मुस्लिम समाजाचा दफन विधी समस्या भूमी असल्याने त्या ठिकाणी करण्यासाठी गेलेल्या लोकांना अडवल्याने त्यांनी मृतदेह एचडी कार्यालय माजलगाव यांच्या दारामध्ये नेऊन ठेवला यामुळे बीड जिल्ह्यातील वातावरण बिघडल्या जमा आहे याकडे बीड ते पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी तर लक्ष दिले आहे नंदकुमार ठाकूर हे सर्व जाती धर्मातील लोकांना सोबत घेऊन काम करणारे पोलीस अधीक्षक आहेत परंतु यावेळी जिल्हाधिकारी पालकमंत्री व निर्वाचित खासदार बजरंग सोनवणे यांनी मात्र दुर्लक्ष केले आहे मुस्लिम समाजाचे अनेक जाती धर्मातील लोकांना पावसाळ्यामध्ये व वर्षाचे बारा महिने अंत्यविधी करण्यासाठी जागा उपलब्ध नसल्याने अनेक गावांमध्ये जाती जातीय तीळ निर्माण होण्याची दाट शक्यता आहे पालकमंत्री धनंजय मुंडे व खासदार बजरंग सोनवणे यांना दिंद्रुड मधील संबंधित प्रकार माहित नसेल का अशी चर्चा बीड जिल्ह्यामध्ये ऐकायला मिळत आहे



# आदामा कंपनीचे शाकेद तणनाशक फवारल्याने दीड एकर सोयाबीन पीक जळून खाक झाले

## शेतकऱ्याची नुकसान भरपाई देण्याची मागणी

प्रतिनिधी, सुनिल थोरात

माजलगाव तालुक्यातील पुरुषोत्तम पुरी येथील शेतकरी बाळासाहेब शेंडगे यांची गट नंबर २३ मध्ये ०२ हेक्टर ०२ आर जमीन असून सदर जमिनीपैकी ६० आर( दिड एकर) जमिनीमध्ये सोयाबीन पिकाची लागवड केलेली असून सदरील सोयाबीन पिकात तण उगवल्यामुळे त्यांनी ०२/०७/२०२४ रोजी कृषी सेवा केंद्रावर जाऊन मला सोयाबीन पिकामधील तण नष्ट करण्यासाठी तणनाशक हवे आहे असे सांगितल्यानंतर त्यांना आदामा कंपनीचे शाकेद तन नाशक देण्यात आले. त्यांनी ते ०३/०७/२०२४ रोजी तन नाशक फवारल्यानंतर दुसऱ्या दिवशी शेतात जाऊन पाहणी केली असता संपूर्ण सोयाबीन पीक जळाल्याचे दिसून आले. त्यामुळे बाळासाहेब शेंडगे यांनी आदामा कंपनीचे शाकेद तणनाशकाबाबत तक्रार असून संबंधित कंपनीने माझी फसवणूक करून माझे अंदाजे १५००००/- रुपयाचे नुकसान केल्याबाबत सांगितले तरी कृषी विभागाने जायमोक्यावर येऊन वस्तुस्थितीसह पंचनामा करून त्या कंपनीवर गुन्हा दाखल करावा व संबंधित कंपनीकडून १००% नुकसान भरपाई तात्काळ देण्यात यावी अशी मागणी केली आहे. अन्यथा त्यांनी कार्यालयासमोर दिनांक १५/०७/२०२४ रोजी सकाळी आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे. बाळासाहेब शेंडगे यांनी ५ जुलै रोजी उपविभागीय कृषी अधिकारी यांना तसे लेखी निवेदन दिलेले आहे. माजलगाव कृषी अधिकारी यांनी शेतावर येऊन पाहणी करून पंचनामा केलेला आहे. संबंधित आदामा कंपनीचे अधिकारी यांनी शेतावर येऊन पाहणी केलेली आहे. आमच्या प्रतिनिधींनी त्यांना माहिती विचारल्यानंतर या शेतकऱ्याला भरपाई मिळेल का असे विचारल्यानंतर त्यांनी हात झटकले आहेत आणि आमच्या कंपनीची कसलीही चुकी नाही असे सांगितले.

# पंढरपुरात व्हीआयपी दर्शन बंद; आता विठुरायाचे दर्शन अवघ्या चार ते पाच तासात

सोलापूर : पंढरपुरात दर्शन रांगेत हजारो भाविक काल मंदिरात दिवसभर व्हीआयपीकडून झटपट दर्शनासाठी गर्दी केल्याने दर्शन रांगेतील गोरगरीब भाविकांना १४ तासापेक्षा जास्त वेळ लागला होता . यातच रात्री पावसाने जोरदार बॅटिंग केल्याने भाविकांचे मोठे हाल झाले होते . संतप्त भाविकांची ही व्यथा -लमिझाने समोर आणल्यानंतर मंदिर प्रशासन खडबडून जागे झाले . आजपासून कोणत्याही व्हीआयपी भाविकांना देवाच्या झटपट दर्शनासाठी न सोडल्याने काळ तासंतास एकाचजागी थांबलेली दर्शन रांग आज जोराने धावू लागली आणि केवळ ४ ते ५ तासात भाविकांना देवाचे दर्शन होऊ लागले.

विठ्ठल दर्शनासाठी आषाढी काळातील १० दिवस संपूर्ण व्हीआयपी दर्शन बंद करण्याची मागणी काल माझाने लावून धरली होती . काळ दिवसभर रांगेत ताटकळत थांबलेल्या भाविकांना रात्री पावसाने झोडपून काढले. दर्शन रांगेतील पत्रे गळू लागल्याने भाविक रात्रभर चिंब भिजून दर्शन रांगेत अडकून पडला होता . काल भाविकांनी थेट मुख्यमंत्र्यांना आवाहन करीत आषाढी काळात येणाऱ्या भाविकांना आमच्या प्रमाणे दर्शन रांगेतून दर्शन घेऊ द्या अशी मागणी केली होती .



# भोगलवाडी शाळेचे मुख्याध्यापक निलंबित

## कामचुकारपणा करणाऱ्या शिक्षकांना बसली धास्ती

धारूर / प्रतिनिधी

तालुक्यातील भोगलवाडी येथील जि.प. माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक ज्ञानोबा बाबुराव जायभाये हे गैरवर्तन करत असल्याच्या अनेक तक्रारी जि.प.शिक्षण विभागाकडे करण्यात आल्या होत्या. या तक्रारींची जि.प. मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी गंभीर तेने दखल घेत सदरील मुख्याध्यापकावर निलंबनाचा कारवाई केली. यामुळे धारूर तालुक्यासह जिल्हा शिक्षण क्षेत्रात एकच खळबळ उडाली आहे.

धारूर तालुक्यातील भोगलवाडी येथील जि.प. माध्यमिक शाळेत ज्ञानोबा बाबुराव जायभाय हे दोन वर्षापासुन मुख्याध्यापक म्हणून कार्यरत आहेत. ते या शाळेत आल्यापासून त्यांचा कार्यकाल वादग्रस्त ठरत होता. असे पालकांतुन सांगण्यात येते. त्यातच त्यांच्या गैरवर्तनाबद्दल अनेक वेळा जि.प. मुख्यकार्यकारी अधिकारी, वरिष्ठ

दि माध्यमिक शाळा भोगलवाई

शिक्षणाधिकारी यांच्यासह ग.शि. कार्यालयाकडे तक्रारी झाल्या होत्या. तक्रारीवरून त्यांची चौकशी करून त्यांना कारणे दाखवा नोटीस ही बजावण्यात आली होती. तसेच त्यांची सुनावणीही घेण्यात आली होती.




सुनावणी दरम्यान मुख्याध्यापक जायभाय हे गैरवर्तन करत असल्याचे दिसून आल्याने मुख्याध्यापक जायभाये यांना जि.प. सेवेतून निलंबित करण्यात येत असल्याचे मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी काढलेल्या निलंबन आदेशात म्हटले. दरम्यान या कडक कारवाईमुळे धारूर तालुक्यासह बीड जिल्ह्यातील शिक्षण क्षेत्रात एकच खळबळ उडाली आहे.

# ओम साईकला गुणगौरव २०२५, पुरस्कार वजीर शेख यांना जाहीर

पाथर्डी / प्रतिनिधी

शिर्डीत प्रथमच भव्य व दिव्य..साईकला गुणगौरवपुरस्कार... ओम साई विकास प्रतिष्ठान व बी.बी.सी.फिल्म प्रोडक्शन. महाराष्ट्र राज्य. यांच्या संयुक्त विद्यमाने.सर्व आर्टिस्ट च्या आग्रहास्तव .साईकला गुणगौरव पुरस्कार... २०२५..आपण एक. जानेवारी.२०२५.रोजी साईच्या पावन भूमीत साईच्याच नावाने नविन वर्षात साई कला गुणगौरव पुरस्कार. २०२५.हा एक.जानेवारी पासून कायम स्वरूपी सुरु करत आहोत. हा साई कला गुणगौरव पुरस्कार.



ज्याने चित्रपट क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले व करत आहे.त्यांना,पत्रकारिता क्षेत्रातील नामवंत,शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर,कला क्षेत्रातील मान्यवर,सामाजिक क्षेत्रातील अतिशय उल्लेखनीय कार्य करत असलेले मान्यवर,वैद्यकीय क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करत असलेले मान्यवर,तसेच राजकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे व इतर क्षेत्रातील अतिशय उल्लेखनीय कार्य करत असलेल्या नामांकित मान्यवर यांना हा साई कला गुणगौरव पुरस्कार. देण्यात येणार आहे.तरी जे वरील पैकी क्षेत्रात काम करत असतील आशा मान्यवरांनी आपला बायोडाटा.९६८९४६७५०६.या नंबर वर पाठविणे.हा पुरस्कार सोहळा.शिर्डीत हॉटेल शांती कमल येथे अतिशय अलिशान व ए.सी.हॉल मध्ये होणार आहे.हे हॉटेल शांती कमल.शिर्डी बसस्थानक पासुन पाच मिनिटाच्या अंतरा वर नगर मनमाड रोड वर आहे.तसेच पुरस्कार साठी येणार्या पुरस्कार प्राप्त करणाराची एक दिवस व एक रात्री राहाण्याची व जेवनाची व्यवस्था करण्यात येणार आहे.तरी आपला बायोडाटा लवकरात लवकर ९६८९४६७५०६.या नंबर वर पाठविणे. या पुरस्कार सोहळ्या साठी या सोहळा समितीचे अध्यक्ष मा.श्री.सुदाम संसारे.सर,उपाध्यक्षा मा.सौ.वंदना मिलिंद गव्हाणे मॅडम. सचिव. सिमा सपकाळ.मॅडम कार्याध्यक्ष. मा.सौ.अर्चना परदेशी.मॅडम. सल्लागार. मा.श्री.डॉ.अजय वारुळे.सर. स्वागताध्यक्ष. सोनल चौधरी मॅडम,सदस्य. सुनिता तायडे मॅडम. जळगाव,श्री.सभाजीराव खैरे.सर,श्री.समाधान बिथरे.सर,श्री.संजय ढाकरके.सर,श्री.राजेश काळे सर,श्री.पापाभाई बेलापुरकर,श्री.मयुर शिंदे.सर,श्री.सलिम सौदागर सर,श्री.दिपक शेळके सर,पत्रकार व अभिनेते श्री.वजीर शेख सर,पत्रकार व दिग्दर्शक. मा.श्री.पांडुरंग गोरे.सर श्री.गोरख पांढरे.सर,श्री.बाळासाहेब वराळे सर,श्री.नंदन खरे सर,सौ.सुनंदा सुर्यवंशी मॅडम,प्रतिभा प्रमोद मॅडम,प्रिया उशिरे मॅडम,जिविका सोनार मॅडम,मिनाक्षी इचके मॅडम आणि सर्व सोहळा समितीस सहकार्य करणारे अतिशय परिश्रम घेत आहेत.



## खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या ५४ व्या वाढदिवसानिमित्त५४ वृक्ष लागवड: संतोष पवार. किरण डावकर

बीड (प्रतिनिधी)

बीड जिल्ह्याचे लोकप्रिय खासदार शेतकरी पुत्र आदरणीय मा. श्री. बजरंग बप्पा सोनवणे साहेब यांच्या ५४ व्या वाढदिवसानिमित्त ५४ वृक्ष लावण्याचा संकल्प केला होता या अनुषंगाने युवा नेते संतोष पवार व सामाजिक कार्यकर्ता किरण डावकर यांनी अनेक ठिकाणी वृक्ष लागवड करून एक नवीन संदेश देण्याचा प्रयत्न केला आहे बीड जिल्ह्याच्या जनतेने बजरंग बाप्पाच्या रूपाने एक नवीन रोपट रुजवलं आहे आणि या रोपट्याचं रूपांतर येणाऱ्या काळामध्ये खूप मोठे होऊन बीड जिल्ह्याला सावली दिल्याशिवाय राहणार नाही या अनुषंगाने बीड जिल्ह्यामध्ये असे अनेक रोपटे तयार व्हावे यासाठी ५४ वृक्ष लागवड करून बजरंग बाप्पाला शुभेच्छा वर्षाव केला आहे यावेळी अनेक मान्यवर उपस्थित होते पाटोदा तालुका जिल्हा बीड व अंबळनेर सर्कल च्या वतीने व नाळवंडी सर्कल सर्कल बीड पुणे शहरांमध्ये करण्यात आलेला आहे झाडे लावताना माननीय खासदार श्री.बजरंग बप्पा सोनवणे मित्र मंडळ पुणे शहर व सामाजिक कार्यकर्ते किरण दादा डावकर व मा. श्री संतोष दादा पवार मित्रपरिवार उपस्थित होते.

# चारशे वर्षांपूर्वीचा खुलताबादचे मुख्यप्रवेशद्वार ऐतिहासिक नगारखाना दरवाजा आजही सुरक्षित

## अनेक वर्ष ऊन वारा खात आजही दिमाखात

कन्नड/प्रतिनिधी

खुलताबाद: खुलताबाद शहराचे प्रवेशद्वार म्हणून ओळखला जाणारा ऐतिहासिक पुरातन नगारखाना दरवाजा गेल्या चारशे वर्षांपूर्वीपासून अनेक ऊन वारा खात आजही दिमाखात असून हा दरावाजा खुलताबाद शहराचे खास आकर्षण आहे. खुलताबाद शहर हे ऐतिहासिक , धार्मिक तीर्थक्षेत्र तसेच पर्यटनस्थळ म्हणून प्रसिध्द आहे. खुलताबाद शहरात जागृत भद्रा मारूती मंदीर, विविध दर्गा, निजामकालीन शासकीय विश्रामगृह, औरंगजेब यांची कबर , पुरातन बनाबेगम बाग, तसेच शहर परिसरात जगप्रसिद्ध वेरूळ लेणी, बारावे ज्योतिर्लिंग श्री घृष्णेश्वर, शहाजीराजे भोसले यांचे स्मारक, मिनी महाबळेश्वर म्हणून ओळखले जाणारे प्रसिद्ध पर्यटनस्थळ म्हैसमाळ , तपोभूमी दत्तधाम सुलीभंजन आदी धार्मिक व पर्यटनस्थळ असल्याने दररोज हजारो पर्यटक व भाविक या ठिकाणी भेटी देत असतात.

मोगल बादशहा औरंगजेब यांचा मुलगा सुलतान मौजमशाह याने खुलताबाद शहराच्या संरक्षणासाठी १६९८ ते १७१० यादरम्यान चौहो बाजूंनी तटबंदी भिंत बांधली , त्यावर मोठमोठे बुरुज व दरवाजे बांधले. नगारखाना गेट हे खुलताबाद शहराचे मुख्य प्रवेशद्वार. आनंदाच्या क्षणी याठिकाणी नगारखाना गेटच्या वर असलेल्या खोलीमध्ये नगारे वाजविले जात



असे .खुलताबादच्या ऐतिहासिक नगारखाना गेटला केंद्र व राज्य शासनाच्या निधीतून दीड कोटी रूपये खर्च करून नवा आकर्षक लुक देण्यात आला आहे. जिल्ह्यातील खुलताबाद हे तालुक्याचे ठिकाणी असून ऐतिहासिक , धार्मिक तीर्थक्षेत्र तसेच पर्यटनस्थळ आहे. मोगल बादशहा औरंगजेब यांचा मुलगा सुलतान मोहम्मद आजमशाह याने खुलताबाद शहराच्या संरक्षणासाठी १६९८ ते १७१० यादरम्यान ४७२० फुट लांब व सहा फुट रुंद १५ ते २० फुट उंच चौहो बाजूंनी तटबंदी भिंत बांधली , त्यावर मोठमोठे बुरुज व सहा दरवाजे , दोन खिडक्या बांधल्या. नगारखाना गेट हे खुलताबाद शहराचे मुख्य प्रवेशद्वार आहे . याची उंची एवढी उंच आहे की, मोठा हत्ती अंबारीसह आत प्रवेश करू शकतो .प्रवेशद्वाराजवळ दोन्हीही बाजूला दोन खोल्या आहेत. त्यात पुन्हा एका एका लहान खोली आहे. त्यातून वरच्या मजल्यावर जाण्यासाठी आतून पाय-या आहेत. तटबंदीचे बांधकाम दगड , चुनामिश्रीत वाळूत केलेले आहे. या बांधकामात झरोके ठेवलेले आहेत . झरोके हे आकाशाकडून जमिनीच्या दिशेने तयार करण्यात आलेले आहेत. शत्रूंना पाहण्यासाठी व बाणाचा किंवा गोळीचा मारा करण्यासाठी याचा उपयोग केला जात होता. वरची भिंत दोन फुट जाडीची व चार फुट उंचीची आहे. टेहळणीसाठी त्याचा उपयोग होत असे. या तटबंदीला एकूण आठ बुरुज असून सहा मोठे बुरुज दोन लहान बुरुज आहेत. सर्व बुरुजांची उंची भिंतीच्या समांतर आहे. वरच्या मजल्यावर मध्यभागी नगारा वाजविण्यासाठी दालन व बाजूच्या दोन्ही खोल्यांवर घुमट आहे. तिन्ही घुमटावर धातूचा कळस आहे.


### .... दरवाजा परिसरात सुशोभिकरण करावे-

खुलताबाद शहराची ओळख असलेला ऐतिहासक नगारखाना दरवाजा परिसराचे सुशोभिकरण करण्याची गरज आहे. दरवाजा परिसराला आकर्षक विद्यूत रोषणाई करण्यात आली होती परंतू नंतर ती बंद करण्यात आली आहे.

# 'ओबीसी'तून मराठा आरक्षण कधीच शक्य नाही!

## प्रा.लक्ष्मण हाके यांची भूमिका

पुणे : मनोज जरांगे हे प्रत्येक आंदोलनात वेगळी भूमिका मांडतात. इतर मागास प्रवर्गातून (ओबीसी) बेकायदा प्रमाणपत्र वाटप होत असून हे घटनाविरोधी आहे. हा प्रयत्न म्हणजे सामाजिक आरक्षण चोरण्याचा प्रकार आहे. मात्र, ओबीसीतून मराठा आरक्षण कधीच साध्य होणार नाही, अशी भूमिका ओबीसी आरक्षणाचे नेते प्रा. लक्ष्मण हाके यांनी मांडली.



### 'शरद पवारांकडे उमेदवारी मागितली होती'

ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्याकडे उमेदवारी मागितली होती. त्यांनी मान्यही केले होते, मात्र नंतर काय झाले, त्यांनाच माहीत. निवडणुकीत मला पाच हजार मते मिळाली. मात्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा ज्योतिबा फुले यांना देखील निवडणुकीत पराभवास सामोरे जावे लागले होते. संसदेत धोरणे ठरतात, कायदा होत असतो, याकरिता आपली बाजू मांडण्यासाठी मला संसदेत जायचे होते. निवडणूक लढविण्यासाठी पैसा, ताकद, मनुष्यबळ माझ्याकडे नव्हते. तरीदेखील मी निवडणूक लढविली, असेही हाके यांनी सांगितले.

# गावागावांत मराठा-ओबीसी वाद सुरु झाला आहे,अशोक चव्हाण यांचं वक्तव्य

भाजपाचे राज्यसभेचे खासदार अशोक चव्हाण यांनी शुक्रवारी रात्री मनोज जरांगेंची भेट घेतली. तसंच त्यांनी काहीवेळापूर्वी पत्रकार परिषद घेतली. त्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. महाराष्ट्रातल्या तालुक्या-तालुक्यांमध्ये मराठा आणि ओबीसी वाद निर्माण झाला आहे. ही बाब चांगली नाही. मी याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करणार आहे. असंही अशोक चव्हाण यांनी पत्रकारांना सांगितलं.

### मनोज जरांगेंना मदतीचं आश्वासन

मनोज जरांगेंची भेट आम्ही घेतली. काही मागण्या प्रलंबित आहे. सरसकट गुन्हे मागे घ्या ही त्यांची मागणी आहे. त्याकडे आपण लक्ष घालतो आहोत. हैदराबाद गॅझेट प्रमाणे कुणबी प्रमाणपत्रं दिली जावीत ही मागणी आहे. काही गोष्टींचा पाठपुरावा सुरु आहे. मी त्यांना सांगितलं आहे की मी तुम्हाला सर्वतोपरी सहकार्य करतो आहे हे मी मनोज जरांगेंना सांगितलं आहे असं अशोक चव्हाण म्हणाले.

### मराठा समाजाला आरक्षण मिळालं पाहिजे ही माझी व्यक्तिगत भूमिका



मी मनोज जरांगे यांची भेट घेतली. मराठा समाजाला आरक्षण मिळालं पाहिजे ही माझीही व्यक्तिगत भूमिका आहे. मी हा प्रश्न सरकारपुढे याआधीही मांडला आहे. त्यानुसार मी मनोज जरांगेंना माझी भूमिका सांगितली आहे. तसंच त्यांनी सरसकट गुन्हे मागे घेण्याची मागणी केली आहे. मात्र सरकट गुन्ह्यांमध्ये जे गंभीर स्वरुपाचे गुन्हे आहेत जसं की जाळपोळ करणं, तोडफोड, हल्ला करणं अशा सारख्या गुन्ह्यांची प्रकरणी कोर्टात गेली आहेत. त्याचं काय करता येईल यावर चर्चा करावी लागेल. त्याशिवाय जी किरकोळ प्रकरणं आहेत ती मागे घेता येतील. मात्र गंभीर गुन्ह्यांची प्रकरणं कोर्टात आहेत.

# पाथरीतील एका इंग्लिश स्कूलची मान्यता रद्दचा प्रस्ताव पुणे विभागाकडे सादर

पाथरी (प्रतिनिधी)

पाथरी शहरातील चार इंग्लिश स्कूल च्या संदर्भात प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यासाठी उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक) शिक्षणाधिकारी (प्राथमिक) कार्यालय जिल्हा परिषद यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. सदर चौकशी अहवालातील वस्तुस्थिती विचारात घेऊन पाथरी शहरातील एका इंग्लिश स्कूल ची मान्यता रद्द चा प्रस्ताव पुणे विभागाकडे सादर केला असून उर्वरित तीन इंग्लिश स्कूल वर कार्यवाही करण्याचे आदेश शिक्षण उपनिरीक्षक डॉ. सतिश सातव यांनी ३ जुलै रोजी काढले आहेत.

सविस्तर वृत्त असे कि डॉ.सलीम अमीन शेख यांनी दिनांक २ जुलै रोजी पाथरी शहरातील अनाधिकृत चार इंग्रजी शाळांवर कारवाई करणे संदर्भात आमरण उपोषणास बसत असल्या बाबत विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांना निवेदन द्वारे कळविले असता, उपनिरीक्षक डॉ. सतिश सातव यांनी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद परभणी यांना विषयांकित प्रकरणी गोल्डन ड्रिम इंग्लिश स्कूल, जिनियस किडस् इंग्लिश स्कूल, गोदावरी दुधना इंग्लिश स्कूल व लिट्ल फ्लॉवर इंग्लिश स्कूल पाथरी या चार शाळांसंदर्भात प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यासाठी चौकशी समीती गठीत करण्यात आली होती. सदर चौकशी समीतीचा अहवाल या कार्यालयास प्राप्त झाला असून सदर चौकशी करून वस्तुस्थिती विचारात घेऊन गोल्डन ड्रिम इंग्लिश स्कूल पाथरी या शाळेची मान्यता रद्द करण्याबाबतचा प्रस्ताव मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यालयास या कार्यालयाचे पत्र जा.क्र.शिउसं/गुक/२०२३-२४/५०६९, दि.२८/०६/२०२४ अन्वये शिफारशीसह सादर करण्यात आलेला आहे. तसेच उर्वरित जिनियस किड्स इंग्लिश स्कूल, गोदावरी दुधना इंग्लिश स्कूल व लिट्ल फ्लॉवर इंग्लिश स्कूल या तिन्हीही शाळांच्या संदर्भात चौकशी अहवालात स्वयंस्पष्ट अभिप्राय नमूद नसणे तसेच सदर शाळांकडून भौतिक सुविधा निकष पूर्ण करीत नसल्याचे चौकशी अहवालावरून निदर्शनास आल्याने सदर शाळांची बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ मधील कलम १८ नुसार शाळांची मान्यता काढणे बाबतची कार्यवाही करण्यात यावी, असे या कार्यालयास पत्र जा.क्र.शिउपं/गुक/२०२३-२४/५०७० दि.२८/०६/२०२४ अन्वये शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद परभणी यांना कळविलेले आहे.

तसेच वरील प्रकरणी डॉ. सलीम अमीन शेख यांच्या तक्रारीतील नमूद मुद्यांच्या अनुषंगाने या या कार्यालयाच्या स्तरावरून वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली असून आपण दि. ४ जुलै रोजी च्या नियोजित आमरण उपोषणा पासून परावृत्त व्हावे असे कळविले आहे.

# डीसीसी बँक वसुली पथकाने रामकृष्ण बांगर यांच्या घरासमोर वाजवले डफडे

बीड (प्रतिनिधी)

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला पुर्वपदावर आणून पुन्हा शेतकर्यांच्या पाठीशी बँकेचे अर्थिक पाठबळ उभे करण्यासाठी अधिकारी, कर्मचारी जिवाचे रान करत आहेत. अकृषी थकीत कर्जाच्या वसुलीसाठी जिल्हाधिकारी तथा प्रशासक अविनाश पाठक यांच्या मार्गदर्शनाखाली डीसीसी बँकेने वसुली पथक नेमले आहे. हे पथक थकीत कर्जदारांच्या दारात जावून डफडे वाजवत ठिय्या मांडत आहे. पथकाने शनिवारी (दि.६) पाटोदा येथे जावून ४ कोटी रूपयांचे थकीत कर्ज असलेल्या रामकृष्ट बांगर यांच्या दारात डफडे वाजवून गांधीगिरी केली. बँकेच्या या उपक्रमामुळे थकीत कर्जदारांवर चांगलाच दबाव वाढू लागला आहे.



### जिल्हा बँकेच्या वसुली मोहीमेत सर्व अधिकारी कर्मचारी सहभागी

जिल्हाभरातील शेतकर्यांना पुर्वीप्रमाणे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे मोठे अर्थिक पाठबळ मिळवून देण्यासाठी बँकेतील व्यवस्थापक, उपव्यवस्थापक, सहव्यवस्थापक, वसुली अधिकारी, शाखा व्यवस्थापक, सर्व विभागाचे कर्मचारी योगदान देत आहेत. अधिकारी, कर्मचारी घेत असलेली मेहनत आणि वसुलीच्या अनुषंगाने जिल्हा बँक वेगवेगळे उपक्रम राबवत असल्याने लवकरच बँक पुर्वपदावर येईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची ओळख शेतकर्यांची अर्थिक जननी अशी आहे. तब्बल अर्धशतकापेक्षा अधिक वर्षे जिल्हा बँकेने तळागाळातील शेतकर्यांना अर्थिक पाठबळ दिलेले आहे. प्रचंड अडचणीतून सावरत आजही जिल्हा बँकच शेतकर्यांना आधार देत आहे. मात्र काही लोकांनी अकृषी व कृषी संस्थांसाठी कोट्यावधीचे कर्ज घेतले अन् त्याची परतफेड केलीच नाही. यामुळे शेतकर्यांची अर्थिक जननी असलेली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक गेल्या काही वर्षापासून अडचणीत आहे. थकीत कर्जाची वसुली करून बँकेला पुर्वपदावर आणण्यासाठी मुख्याधिकारी, उपमुख्य अधिकारी

# कन्नड तालुक्यातील सेतू केंद्र चालक करताय नागरिकांची लूट लाडली बहीण योजणेसाठी मोजावे लागताय शंभर ते दोनसे रुपये

कन्नड / प्रतिनिधी

महाराष्ट्र शासणानाने लाडली बहीण योजणा सूरू केली असून सध्या महीलावर्गं या योजनेचे फाँमँ भरण्यासाठी तालुक्यातील सेतू केंद्रात मोठ्या प्रमाणात गर्दी करत असल्याने सेतू चालक हे फाँमँ भरण्यासाठी शंभर रूपये घेत आहे. तर कन्नड तालुक्यातील चापानेर औराळा अंधानेर पिशोर चिकलठाण जेहूर आदिसह परीसरातील सेतु चालक नागरिकांची लूट करत आहे , लाडली बहीण योजनेचे १०० ते १५० रूपये पीक विमा काढण्यासाठी १०० ते १५० व ईमारत बांधकाम कामगार योजनेचे फाँम भरण्यासाठी १५०० रूपये .व किसान योजनेचे फामँ भरण्यासाठी ३००० हजार रूपये अशा प्रकारे सवँसामन्य नागरिकांची लूट चालू आहे . तरी संबधित विभागाने लक्ष घालण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.तालुक्यातील पत्रकार मंडळी नी चापानेर येथे पीक विमा भरण्यासाठी शेतकऱ्यांना कडून १०० ते १५० रुपये घेतांना, शेतकऱ्यांच्या तक्रारी वरून दोन सेतू केंद्राचे चे तलाठी आप्पा यांनी पंचनामे केले होते. तसा अहवाल त्यांनी तहसील कार्यालयात दिला होता. मात्र त्या सेतू केंद्राचे ना परवाने रद्द झाले नाही त्यांच्यावर कुठली कारवाई झाली.पुन्हा जोमाने त्यांनी १०० ते १५० रुपये पीक विम्यासाठी घेणे चालू केले आहे.त्यांना कोणाचे अभय आहे हे मात्र कळण्यास तयार नाही.सर्रास शेतकऱ्यांची लूट सुरु आहे.शासनाचा एक रुपयात पीकविमा हे फक्त नावालाच आहे.



या बाबद जेहूर ग्रामपंचायतीचे ग्रामविस्तार अधीकारी श्री चौधरी यांना विचारले असता त्यांनी सांगितले कि शासणानाने हे फाँम मोफत भरण्याचे सांगितले आहे तरी जेहूर ग्रामपंचायतीमध्ये मोफत फामँ भरण्यासाठी महीलांनी यावे असे आवहान त्यांनी केले आहे .याबाबत दैनिक गावकरी चे कन्नड तालुका प्रतीनिधी सोमनाथ पवार यांनी पत्रकार अधिकारी गृपवर पोष्ट टाकताच जेहूर सजाचे तल्हाठी अनिल गायकी यांनी संबधित सेतू केद्र चालकाला भेटी देऊन तंबी दिली

# राष्ट्रीय महामार्गावर पार्किंगचे नियमांची रिक्षा चालकां कडुन पायमली

**माजलगाव : प्रतिनिधी**

**शहरातुन जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग ५४८ सीसी.(खामगाव-पंढरपुर) पालखी मार्ग १०० फुटांचा होता तो तत्काली आमदार रोहिदास देशमुख यांच्या नाकर्तेपणामुळे ७० फुटांचा झाला आणि त्यामुळे तो अरुंद झाला आणि वाहतूकीस मोठा अडथळ्यांची समस्या निर्माण झाली. यातच माजलगाव शहरातील काहि अर्धवट पासिंग चे रिक्षा चालक वाहतूक नियमांची पायमल्ली करुन वाहतूकीला अडथळा निर्माण करत आहेत त्यामुळे काहि नागरिकां कडुन सांगितले जात कि,पिवळया पट्टीच्या आत पार्किंग केली पाहिजे. पण तसे सांगणाऱ्या नागरीकां सोबत दादागीरी करुन त्यांनाच उलटपणे म्हणतात की, तुम्हाला रिक्षा दिसतात का,अनेक वाहने पिवळया पट्टीच्या बाहेर पार्क केली जातात त्यांचे काय असा प्रति प्रश्न विचारुन म्हणतात की, आम्हि पोलीसांना हप्ते देतो पण इतर वाहनांचे काय.?**

याची खात्री करून घेण्यासाठी सदर प्रतिनिधिने नमुद मार्गावरच्या अविष्कार गारमेंट,श्रीकृष्ण मेडीकल, भारत मेडीकल समोर एक अर्धवट पासिंगचा रिक्षा उभा होता म्हणुन त्याचा रिक्षा चालकास यांना सांगितले की, तुमचा रिक्षा पार्किंग मध्ये घ्या. यावर रिक्षा चालकाने उपरोक्त उल्लेखित केल्या नुसार म्हणाला की, त्याने हि एम.जे.(इलेक्ट्रोनिक मिडीया)केलेले आहे. म्हणुन मला पार्किंगचे नियम सांगुनका, काय होईल ते बघुन घेतो. यावर माजलगाल पोलीस प्रशासन अश्या मुजोर रिक्षा चालकां विरोधात कारवाई करून अवैध पार्किंग मध्ये उभ्या राहणाऱ्यां वाहनांना दिड वर्षांच्या जवळपास माजलगाव शहर पोलीसांना आलेले चार जामकर लावुन त्या वाहनां विरोधात कार्यवाही करतील का असा प्रश्न नागरिकां कडुन उपस्थित होत आहे.

## माझी लाडकी बहिणयोजनेत बीड जिल्हयातील अर्ज ऑफलाइन पद्धतीने स्वीकार करून

# महिलांची आर्थिक लुट थांबवा -अँड श्रीनिवास बेदरे

गेवराई / प्रतिनिधी

राज्य सरकारने चालू केलेली माझी लाडकी बहिण योजनेची अंमलबजावणी करतांना सेतु केंद्र, आँनलाईन दुकानात आलेल्या महिलांना कागदपत्रे, नियम अटी दाखवुन ३००,४००, रुपयांची लुट करण्यात येत आहे त्यामुळे प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन कारवाई करुन सेतु केंद्र,आँनलाईन दुकानांवर कारवाई करावे व बीड जिल्ह्यातील अर्ज ऑफलाईन पद्धतीने स्वीकार करावे अशी मागणी जिल्हा युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अँड श्रीनिवास बेदरे यांनी मुख्यमंत्री यांना ईमेल द्वारे केली आहे.

सरकारने सुरू केलेल्या माझी लाडकी बहिणयोजनेची दुरूस्ती करून आँनलाईन अर्ज दाखल करण्याची तारीख १५जुलै ऐवजी ३१ ऑगस्ट २०२४ करण्यात आली आहे तसेच योजनेची ५ एक्करची अट रद्द करण्यात आले आहे.महिलांची वयोमर्यादा २१वर्ष ते ६५ वर्ष करण्यात आले आहे तसेच ज्या कुटुंबाकडे पिवळे किंवा केसरी राशन कार्ड असेल त्यांना उत्पन्नाच्या प्रमाणपत्रातुन सुट देण्यात आली आहे व डोमेसाईल सर्टिफिकेट (अधिवास प्रमाणपत्र)ची अट रद्द करण्यात आली आहे त्यामुळे सर्व महिलांनी माझी लाडकी बहिण योजनेचा लाभ घ्यावा तसेच प्रशासनाने सेतु केंद्र, आँनलाईन दुकानांवर तक्रारी




भेटल्यास तात्काळ दखल घेऊन कारवाई करावे अशी मागणी बीड जिल्हा युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अँड श्रीनिवास बेदरे यांनी मुख्यमंत्री यांना ईमेल द्वारे केली आहे.

# हर्षल नंदलाल पवार याचे स्कॉलरशिप परीक्षेत घवघवीत यश

खुलताबाद / प्रतिनिधी

कन्नड तालुक्यातील देभेगाव केंद्र अंतर्गत बोरसर बुद्रुक या ठिकाणी पहिले ते सातवी जिल्हा परिषद शाळा आहे त्या शाळेमध्ये स्कॉलरशिप परीक्षेसाठी सात विद्यार्थी परीक्षेला बसले होते त्यापैकी दोन विद्यार्थी अपात्र झाले आहेत तर पाच विद्यार्थी पास झाले आहे परंतु त्यामध्ये हर्षल नंदलाल पवार हा विद्यार्थी २१६ मार्क घेऊन प्रथम आला व तो स्कॉलरशिप सर्वसाधारण योजनेसाठी पात्र झाला आहे म्हणून जिल्हा परिषद शाळा बोरसर येथील सर्व शिक्षकांनी त्याचे स्वागत केले.

यावेळी गावातील प्रतिष्ठित नागरिक व ग्रामस्थ उपस्थित होते जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक श्री पवार पी एम, केंद्रप्रमुख जगताप बी जी, वगावाड, एम पी हारदे, एन एच श्रीमती पी जे रिंढे ,श्री जोशी वाय डी, श्रीमती शेख मॅडम यांनी पुष्पगुच्छ देऊन पुढील शिक्षणासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या तर विद्यानिकेतन हायस्कूल बोरसर येथील मुख्याध्यापक जाधव



व्ही.बी, विलास नरोटे, गणेश गायकवाड, गणेश माहीम, मस्के एस वि, महाले ये एस, मोरे वाय एल यांनी सुद्धा हर्षल नंदलाल पवार या विद्यार्थ्यांना कॉलरशिप मध्ये जास्त गुण घेऊन ग्रामीण भागातून पास झाल्यामुळे त्याचे कौतुक करून पुढील अभ्यासासाठी वाटचालीसाठी त्यांनी शुभेच्छा दिल्या व कौतुक केले त्याचे कौतुक केले.



# एकाच कुटुंबातील तिघेजण अपघातामध्ये मृत्यू परिसरामध्ये हळहळ

वाळूज / प्रतिनिधी

भरधाव कारने रस्त्यावर उभ्या असलेल्या ट्रकला पाठीमागून धडक दिली. या भीषण अपघातात एकाच कुटुंबातील तिघांचा मृत्यू झाल्याची मिळत आहे. भीषण अपघातानंतर परिसरात एकच खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील धुळे-सोलापूर हायवे रस्त्यावरील माळीवाडा-फातियाबाद येथे झालेल्या अपघातात एकाच कुटुंबातील तिघांचा अपघात झाल्याची घटना घडली आहे.भरधाव कारने उभ्या असलेल्या ट्रकला पाठीमागून धडक दिल्याने हा भीषण अपघात घडला. अपघातानंतर ट्रक चालक घटनास्थळावरून फरार झाला आहे. या अपघातात मृत झालेले तिघेही लोक बजाजनगर भागात राहत असल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे.

कन्नडवरून छत्रपती संभाजीनगरकडे येताना अपघात झाल्याची माहिती मिळत आहे. अलकाबाई राजू उचित, राजू आत्माराम उचित आणि अर्जुन राजू उचित या एकाच कुटुंबातील तिघांचा मृत्यू झाला आहे. या तिघांचा मृत्यू झाल्याने उचित कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. तिघांच्या मृत्यूने वाळूज परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

# दैनिकाप्रमाणेच साप्ताहिकांनाही जाहिरीचे वितरण करा

## नागपूर जिल्हाधिकारी कार्यालयासामोर व्हॉईस ऑफ मिडीयाचे धरणे आंदोलन

नागपूर : दैनिकाप्रमाणेच साप्ताहिकांनाही जाहिरीचे वितरण करा या मागणीसह एकुण १६ मागण्यासांठी व्हॉईस ऑफ मिडीया सप्ताहिक विंग द्वारे आनंद आंबेकर (नागपूर जिल्हाध्यक्ष 'व्हॉईस ऑफ मिडीया') यांच्या नेतृत्वात नागपूर जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयासामोर आंदोलन करण्यात आले.

यावेळी त्यांच्या मागण्या मध्ये १) आगामी विधानसभा निवडणुकीमध्ये दैनिकाप्रमाणेच साप्ताहिकांनाही जाहिरातीचे वितरण व्हावे. २) साप्ताहिक वृत्तपत्राची द्वीवार्षिक पडताळणी पाच वर्षात करावी. ३)साप्ताहिक वृत्तपत्राच्या जाहिरातीची दरवाढ करावी. ४) अधिस्वीकृती धारक पत्रकारांना एसटी महामंडळात परिवारासह सवलत देण्यात यावी. ५) रेल्वे प्रवासासाठी अधिस्वीकृती धारकांना पुन्हा सवलत सुरू करावी. ६) पत्रकारांसाठी आरोग्य विमा व मोफत उपचाराची सवलत देण्यात यावी. ७) आर.एन.आय. कडून नवीन नियमावलीनुसार लादण्यात आलेल्या जाचक अटी रद्द कराव्यात. ८) ज्या पत्रकारांना पत्रकारितेमध्ये दहा वर्षे पूर्ण झाली आहेत, अशा पत्रकारांना अधिस्वीकृती कार्ड देण्यात यावे. ९) राज्याच्या माहिती महासंचालनालयाने शासनाचे पोर्टल तयार करून, त्या पोर्टलवर नव्याने पत्रकारितेत पदवी पूर्ण करून किमान तीन महिने पत्रकारितेचे प्रशिक्षण पूर्ण केले आहे, अशांना पत्रकार म्हणून प्रमाणपत्र देण्यात यावे. (जसे की बार कौन्सिल वकिलांना वकिली करण्याचा अधिस्विकृती परवाना देते तसा पत्रकार असल्याचा अधिस्विकृत परवाना मिळावा.) १०) राज्यातील अनेक वर्तमानपत्र, साप्ताहिके, मासिक यांना जाहिराती देताना सातत्याने डावलण्याचा प्रकार पुढे आला आहे, तो प्रकार थांबून त्यांना जाहिराती देण्यात याव्यात. सर्वांना जाहिराती मिळतील याचे नवीन निकष तातडीने तयार करावेत. तसा शासन निर्णय काढावा.



पत्रकारांसाठी स्वतंत्र महामंडळ स्थापन करण्यात यावे. त्या महामंडळाच्या माध्यमातून पत्रकार, त्यांच्या पाल्यांना व्यवसायासाठी मदत करण्यात यावी. याबाबत सरकारने आपल्याकडे जी माहिती मागविली आहे ती तातडीने द्यावी.११) माहिती महासंचालनालय यांच्या वतीने सकारात्मक पत्रकारितेला प्रोत्साहित करणारे पुरस्कार गेल्या अनेक वर्षांपासून रखडले आहेत, ते देण्यात यावे. १२) मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पत्रकारांच्या सेवानिवृत्तीनंतर देण्यात येणारे मानधन २० हजार रुपये करू, अशी घोषणा केली होती. टीव्ही, रेडियो आणि सोशल मीडियात काम करणार्या पत्रकारांना श्रमिक पत्रकार म्हणून मंत्रिमंडळाने घोषणा केली, या दोन विषयांचा जीआर तातडीने काढावा.१३) अधिस्वीकृती कार्ड आणि सेवानिवृत्तीनंतर देण्यात येणारे मानधन याबाबत असणााया जाचक अटी रद्द करण्यात याव्यात. त्याबाबत कमिटी नेमून ज्यांचे ज्यांचे प्रस्ताव रखडले आहेत, ते मार्गी लावावेत. १४) सर्व ठिकाणी वेगाने वाढणााया आणि भविष्यात पत्रकारितेची नांदी असणााया सोशल मीडिया पत्रकारितेसाठी तातडीने जाहिरातींबाबत पॉलिसी बनवावी. सोशल मीडियांनाही जाहिराती देण्याबाबत तातडीने निर्णय घ्यावा. १५) ज्यांनी पत्रकारितेत किमान दोन वर्ष पूर्ण केली आहेत, अशा प्रत्येक पत्रकार आणि त्यांच्या कुटुंबीयांना विमा सुरक्षा कवच देण्यासंबंधीच्या सूचना प्रत्येक नोंदणी असलेल्या माध्यमाच्या मालकांना देण्यात याव्यात. १६) सरकार आणि राज्य कामगार विभाग यांना या सूचनांचे पालन काटेकोर करण्याबाबत मार्गदर्शिका द्यावी, ईत्यादी मागण्या दिलेल्या निवेदनात करण्यात आल्या.

आंदोलनानंतर मा. अनुप खांडे (अतिरिक्त जिल्हाधिकारी नागपूर) यांना निवेदन देण्यात आले यावेळी व्हाईस ऑफ मीडियाचे नागपूर जिल्हाध्यक्ष आनंद आंबेकर, पांडुरंग भोंगाडे (संपादक निर्भीड, नागपूर जिल्हाध्यक्ष 'व्हॉईस ऑफ मिडिया', साप्ताहिक विंग) कपिल वानखडे (कार्याध्यक्ष, संपादक नागपूर क्रांती), सोपान बेताल (संघटक, संपादक जननायक आवाज), संपादक सुरज मांजरे (संघटक, संपादक बळीराज्य),संकेत जगनाडे (प्रवक्ता, संपादक बिनधास्त), संपादक जनवासी) यांची उपस्थिती होती.

# आम्रवन महाविहार देवगाव (फाटा) च्या जागेची मा.आ.बोर्डीकरा तर्फे पाहणी

## भव्य बुद्ध विहार व बुद्ध मूर्तीची होणार उभारणी

प्रतिनिधी ।जिंतूर

जिंतूर--मा.आ.रामप्रसाद बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यसम्राट आमदार मेघना बोर्डीकरांच्या कल्पक कल्पनेतून महाविहार देवगाव (फाटा) येथे लवकरच भव्यदिव्य विहार व भव्य तथागत मूर्तीची मूर्तीस्थापणा होणार आहे.त्या निमित्त मा.आ.रामप्रसाद बोर्डीकरांनी सदरील जागेची पाहणी सुरू होत असलेल्या कामाची पाहणी चौकशी केली.या पूर्वीही आमदार मेघना बोर्डीकरांनी सुद्धा आम्रवन महाविहार येथे भेट देऊन पूज्य भदंते यांच्यासह या कामांसबंधी सविस्तरपणे चर्चा केली.या नंतर माजी आमदार रामप्रसाद बोर्डीकरांनी दिनांक ४ जून २०२४ रोजी धावती भेट देत सर्व जागेची पाहणी केली.या वेळी त्यांच्या समवेत पूज्य भदंते संघरत्न भाजपअनुजा तालुका अध्यक्ष विजय वाकळे, गुणीरत्न वाकोडे,दत्ता नवले पाटील पाटील,सरचिटणीस सुमेध सूर्यवंशी, युवराज घनसावध, अमोल वाघ, राजू जाधव आप्पा राजेश खंदारे पत्रकार (पूर्णा) लक्ष्मण खंदारे,दिनकर खंदारे, संजय जाधव,व इंजिनिअर हाजी अन्सारी तसेच गुत्तेदार इम्रोज भाई आदींची उपस्थिती यावेळी होती.मतदारसंघातील या आम्रवन महाविहार



देवगाव (फाटा) उभारण्यात येणाऱ्या भव्यदिव्य बुद्ध विहार व बुद्ध मूर्तीची स्थापना ही सबंध जिल्ह्यासह मतदारसंघा साठी भूषण राहील याची आम्हाला अभिमान आहे.असे गौरवउदगार मा.आ.रामप्रसाद बोर्डीरकांनी काढले.तत्पूर्वी त्यांनी गौतम बुद्ध महामानवास डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेस अभिवादन केले.भिक्कु संघ व पूज्य भंदते संघरत्न यांचा सत्कार केल्या नंतर मा.आ.रामप्रसाद बोर्डीकरांचाही उपस्थिती उपासका तर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला.या वेळी परिसरातील बौद्ध उपासक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

# मनसेचे जागरण गोंधळ आंदोलन!

बीड (प्रतिनिधि)

महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास यंत्रणेच्या बीड येथील मुख्य कार्यालयासमोर दिनांक १० जुलै रोजी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने जागरण गोंधळ आंदोलन करण्यात येणार आहे. बीड जिल्ह्यातील मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत झालेल्या कामांची चौकशी करत मे राजकमल कन्स्ट्रक्शन कंपनीवर गुन्हा नोंद व कन्स्ट्रक्शन कंपनी काळी यादीत टाकण्याची मागणी मनसेच्या वतीने करण्यात आलेली आहे. याची दखल बीड व छत्रपती संभाजी नगर येथील विभागीय कार्यालयाने घेतली नसल्याने कार्यकारी अभियंता सगर यांच्या भ्रष्टाचारा विरोधात जागरण गोंधळ घालण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री ग्राम सडक योजना तथा पंतप्रधान ग्राम सडक योजनेच्या कामात बीड मध्ये बोगसगिरी करण्यात आली आहे. कोटच्यावधी रुपयांचे टेंडर असताना अंदाजपत्रका नुसार कामे न करता बिल उचलण्यात आलेली आहे. या विरोधात मागील वर्षापासून मनसेने मे राजकमल कन्स्ट्रक्शन यांची विविध स्तरावर तक्रार करण्यात आलेली होती .याची दखल बीड येथील महाराष्ट्र ग्रामीण विकास यंत्रणेचे कार्यकारी अभियंता सगर हे घेत नसून वरिष्ठ अधिकारीही सगर यांना वाचवण्याचा प्रयत्न करत आहेत. महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास योजने मधील झालेली कामे अत्यंत बोगस गिरीने करण्यात आलेली आहे तीन महिन्यातच काही ठिकाणी रस्ते उखडलेले आहे जागोजागी खड्डे पडले आहेत टेंडर देताना दहा वर्षाचे मेंटनस संबंधित कन्स्ट्रक्शन कंपनीला बंधनकारक आहे .मात्र मेंटेनन्स ची कामेही होत नसल्याने ग्रामीण भागातील दळणवळणीचा मुख्य स्त्रोत असणारा रस्ता भ्रष्टाचाराच्या विळख्यात सापडला आहे. सगर यांना कोणतीही गंभीरता नसल्याने संबंधित कन्स्ट्रक्शन कंपनीचे बिले आता करण्यात सगर हे कोणतीही कामाची शहानिशा करताना दिसत नाहीत .महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास यंत्रणा बीड जिल्ह्यात पूर्णपणे भ्रष्टाचाराने बुडालेली आहे .या विरोधात दिनांक १० जुलै रोजी बीड येथील मुख्य कार्यालया समोर सगर यांच्या कारणामांचे पाढे जागरण गोंधळ च्या माध्यमातून वाचण्यात येणार आहे. या आंदोलनात मोठ्या संख्येने कार्यकर्त्यांनी व सामान्य नागरिकांनी सहभाग नोंदवण्याचे आवाहन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या महिला आघाडीच्या प्रदेश उपाध्यक्ष वर्षाताई जगदाळे यांनी केले आहे.

## कार्यकारी अभियंता सगर यांच्या भ्रष्टाचाराचे वाचणार पाढे!



‘तुतारीला’मुस्लिमांनी तारलं!समाज अपेक्षा राष्ट्रवादीने माजलगाव विधानसभेला मुस्लिम उमेदवार देण्याची

# ‘सामाजिक कार्यासह’शहर विकास’ करणारे मा.नगराध्यक्ष शेख मंजूर ठरु शकतात दावेदार!

माजलगाव /प्रतिनिधी

राज्यात महाविकास आघाडीला दैदिप्यमान यश मिळालं आहे.या यशाचा खरा प्रमुख वाटेकरी मुस्लिम मतदार ठरला आहे. दरम्यान बीड जिल्ह्यातही भाजप महायुतीच्या प्रबळ उमेदवारासमोर मुस्लिमांनी तुतारीला तारलं आहे. त्यामुळे शरदचंद्रजी पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने सहकार्याची परतफेड म्हणून माजलगाव मतदार संघासाठी मुस्लिम चेहरा देण्याची अपेक्षा आहे.मुस्लिम मतदारांचे संख्याबळ याठिकाणी निर्णायक आहे.त्यामुळे या भावना मुस्लिम समाजामधून व्यक्त होत आहेत.दरम्यान तूतारीला माजलगावात सर्वात प्रथम साथ देणारे,ज्यांची सामाजिक कार्यात ओळख आहे. ज्यांनी नगराध्यक्ष पदाच्या कार्यकाळात शहर’विकास’करून दाखवला आहे.त्या नगराध्यक्ष शेख मंजूर यांची माजलगाव विधान सभेसाठी शरदचंद्रजी पवार यांच्या राष्ट्रवादीकडून प्रबळ दावेदारी मानल्या जात आहे.सामाजिक कार्यातून पुढे आलेला शेख मंजूर नावाचा युवा चेहरा अल्पावधीतच माजलगावच्या राजकीय क्षितिजावर प्रभावी ठरला आहे.सुरुवातीच्या काळात कुठलीही राजकीय मनीषा ध्यानी न बाळगता शेख मंजुर यांनी याठिकाणी काम करण्यास सुरुवात केली होती.सामाजिक दायित्व म्हणून त्यांनी तालुक्यात २०१३ साली २४ गरीब मुस्लिम मुलींचे स्वखर्चाने इस्लामिक पद्धतीने सामूहिक विवाह सोहळ्यात लग्न लावून दिले आहे.एका सेवाभावी संस्थेला रुग्णवाहिका खरेदी करण्यास एक लाख रुपयाची मदत देऊन त्यांनी रुग्णसेवेसही आपला हातभार लावला आहे.तर क्रिकेट सारख्या खेळायला प्रोत्साहन देण्यासाठी याठिकाणी युवकांच्या स्पर्धा त्यांनी नेहमीच घेतल्या आहेत.स्पर्धकांना बक्षिसाच्या रूपाने आर्थिक मदत केली आहे. ज्यामुळे युवकांना खेळ खेळण्यास प्रोत्साहन मिळाले आहे.सुवर्णसंधी म्हणून मिळालेल्या नगराध्यक्ष पदाच्या कार्यकाळात शहराचा विकास करून नगराध्यक्ष काय करू शकतो याची चूनुकही त्यांनी शहरवासीयांना दाखवून दिली आहे.सुसज्जन नगर परिषद इमारत,सातशे घरकुलांना मंजुरी देऊन गरिबांचे हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण केले.जाहीर कार्यक्रमात घरकुलधारकांच्या घराचे स्वप्न झाले म्हणून त्यांनाच भेटवस्तू देऊन सत्कार केला.शहरात १२२ दर्जेदार रस्त्याचे कामे मार्गी लागली.त्यामुळे त्यांचा हा विकासाचा ट्रेलर अवघ्या मतदारसंघात आपली ओळख निर्माण करून आहे.एखादा माणूस राजकारणात,समाजकारणात किती वर्षापासून,कार्यरत आहे, यावर त्याच्या कामाचं मूल्यमापन ठरत नसल्याची साक्ष देत आहे.तर कमी वेळातही आलेल्या संधीचं सोनं करण्याचं कसंब ज्याच्याकडे असतं तोच आपल्या कर्तुत्वाचा ठसा आपल्या कामातून सर्वत्र दाखवत असतो.आणि लोकइच्छेने नेतृत्वाचा तो दावेदार बनतो.हकदार बनतो.असं व्यक्तिमत्व म्हणून मा.नगराध्यक्ष शेख मंजूर यांनी आपली ओळख याठिकाणी निर्माण केली आहे.याच विकासशील नेतृत्वाला मतदार संघात आमदारकीची संधी मिळाली तर मतदार संघातही कायापालट होण्यास वेळ लागणार नाही.व ही संधी शरदचंद्रजी पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने जिल्ह्यातुन एक मुस्लिम चेहरा म्हणून शेख मंजूर यांना देण्याची अपेक्षा आहे.कारण शेख मंजूर यांनी सर्वात प्रथम माजलगाव मध्ये तुतारीला साथ दिली आहे.सुरुवातीस कोणीही बडा नेता तुतारी सोबत येण्यास तयार नव्हता.त्यावेळी शेख मंजूर यांनी शरदचंद्रजी पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसची ताकत येथील प्रस्थापित नेत्यांसमोर प्रबळ करण्याचा प्रयत्न केला.मोर्चे, आंदोलने,मेळावे असे विविध कार्यक्रम आयोजित करत तुतारीवाला माणुस या चिन्हाची, पक्षाची जनजागृती,बांधनी त्यांनी मतदारसंघात केली.लोकसभा निवडणुकीत घरोघर पक्षाच्या उमेदवाराचा प्रचार करून विजय खेचून आणण्यात त्यांनी मोठे श्रम घेतले आहे.कर्तृत्वशील विकासशील नेतृत्व म्हणून त्यांच्या कडे पाहिल्या जातं.जे अनेक धुरंदरांना अचंबित करणारं आहे.जे येथील प्रस्थापितांना जमलं नाही,ते शेख मंजूर या तरुणाने शहरात करून दाखवलं.प्रशासकीय पकड, सर्वसामान्यांना सहज उपलब्ध होणारा’माणुस’ही त्यांची ठसठशीत ओळख याठिकाणी आहे.कामाचा झपाटा,सर्व समाजातील थोरामोठ्यांविषयी आदर, सर्वाविषयी असलेला शिष्टाचार, विश्वास,तरुणांसह ज्येष्ठ नागरिकांच्या मनात दरम्यानच्या काळापासून आजपर्यंत मोठ्या प्रमाणात वाढताना दिसत आहे. आजच्या बदलत्या राजकीय समीकरणात अशा विकासशील नेतृत्वाला आमदारकीची संधी मिळाली तर निश्चितच ते मतदारसंघात विकास ,अशी चर्चा येत्या विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने सर्वत्र ऐकायला मिळत आहे.म्हणूनच त्यांची शरदचंद्रजी पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने प्रबळ दावेदारी मानल्या जात आहे.मुस्लिम समाज अपेक्षा आहे राष्ट्रवादीने माजलगाव मतदार संघात मुस्लिम चेहऱ्याला उमेदवारी देण्याची.



## (उद्धव बाळासाहेब ठाकरे ) शिवसेनेच्या वतीने गुणवंत शालेय विद्यार्थ्यांचा गुणगौरव




पिंपळवंडी तालुका पाटोदा येथे स्वराज्यझेप प्रतिष्ठान पिंपळवंडी चे संस्थापक अध्यक्ष व शिवसेनेचे पाटोदा तालुका उपतालुकाप्रमुख अशोकजी पवार यांच्या आयोजित व गुरुवर्य महंत श्री.स्वामी महादेवानंद भारती महाराज,शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर,उपविभागीय अधिकारी प्रमोद कुदळे साहेब,राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक संदीप पवार सर, पोलिस निरीक्षक भार्गव सपकाळ साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत शालांतर गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. याप्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर मार्गदर्शन करताना म्हणाले विद्यार्थ्यांना शिक्षणासह अध्यात्मिक जिवन व संस्कार खुप गरजेचे आहेत, सर्व विद्यार्थ्यांनी जिद्द व चिकाटीने अभ्यास करून आई वडीलांची मान अभिमानाने उंचवा असे मार्गदर्शन करून सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व त्यांना पुढील शालेय जिवनासाठी खूप खूप शुभेच्छा दिल्या. यावेळी उपजिल्हाप्रमुख आजिनाथजी खेडकर, जिल्हा संघटक रतन तात्या गुजर,पाटोदा तालुका प्रमुख मुकूंद शिंदे, शिरूर तालुका प्रमुख सोपान काका मोरे, पिंपळवंडी सरपंच निलेश मोरे,पिंपळवंडी चे उपसरपंच दादासाहेब पवार,अंमळनेर चे माजी सरपंच उद्धव पवार, पाटोदा युवासेना तालुका प्रमुख कृष्णा चौरे,शहर प्रमुख अजिंक्य डोरले,वारूंगळे साहेब, गोकुळ पवार, श्रीकांत उकांडे, मनोज भराटे, विजय डांबे, पत्रकार भाऊसाहेब पवार, पत्रकार बबन दादा लोखंडे, अजय गायकवाड,शिवाजी पवार,-,ठ पवार सर सह सर्व शिक्षकवृंद,पालक व शालेय विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते...!!

## वाढदिवसाचा खर्च सुधाकरच्या जगण्याला पत्रकारांच्या आवाहनात कांबळे ठरले ‘दत्त’

माजलगाव /प्रतिनिधी

पत्रकार सुधाकर सोनवणे यांना गळ्याचा कर्करोग झाल्या नंतर सर्व स्तरातून त्यांचे दुख वाटून घेतले जात असताना काँग्रेस अनुसूचित सेल चे जिल्हाध्यक्ष तथा परळी मतदार संघाचे निरीक्षक दत्ता कांबळे यांनी आपल्या वाढदिवसाचा खर्च ५५५५ रु सुधाकर यांच्या आरोग्यासाठी दिला. माजलगाव पत्रकार संघाच्या आवाहनानंतर

त्यांनी घेतलेल्या या निर्णयाचे सर्वत्र स्वागत होते आहे. माजलगाव पत्रकार संघाचे बाळासाहेब आडागळे परमेश्वर सोळंके, अमर साळवे, प्रचंड सोळंके, अनंत घडसिंगे यांनी सुधाकर सोनवणे साठी आवाहन केले आणि अनेकांनी यास प्रतिसाद दिला. सुधाकर सोनवणे




यांच्या बद्दल ची माहिती लोकाशा मधून समोर येताच सर्व क्षेत्रातून मदतीचा ओघ सुरु झाला. माजलगाव मधील पत्रकारांनी या मदत कार्यात घेतलेली भूमिका कर्त्या सुधारकाची साक्ष असल्याचे बोलले जाते आहे. दत्ताभाऊ कांबळे यांचे सामाजिक कार्य नेहमीच आदर्श राहिलेले आहे. त्यांची मदत सुधाकर साठी संजीवनी ठरणार असल्याचे बोलले जात

## जिल्हा परिषद शाळेत गुणवत्तापूर्ण शिक्षण-पो.नि.मुदीराज

बीड । प्रतिनिधी

शनिवार दि.६ जुलै रोजी जि.प.शाळा गांधीनगर (मराठी) बीड या शाळेत गुरू आनंद महिला प्रतिष्ठान बीड व प्रयास फाऊंडेशन मुंबईच्या वतीने वह्या, पेन, पेन्सिल इत्यादी शैक्षणिक साहित्याचे वाटप विद्यार्थ्यांना करण्यात आले.

समाजसेविका सिमाताई ओस्तवाल आयोजित शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रमाचे अध्यक्ष पेठ बीड पोलीस स्टेशन बीडचे पोलीस निरीक्षक अशोक मुदीराज हे होते तर प्रमुख अतिथी रमेश घोलप, उद्योजक हकीम मनियार, केंद्रप्रमुख कमल लांडगे, केंद्रीय मुख्याध्यापिका, दैनिक सरकारचो संपादक खान, कास्ट्राईबचे राज्यध्यक्ष




अनिल जाधवर हे होते.

प्रयास फाऊंडेशन मुंबईच्या वतीने विद्यार्थ्यांना अतिथिंच्या हस्ते शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले होते. यावेळी सिमाई ओस्तवाल यांनी गुरूग्राम महिला प्रतिष्ठान हे गरीब व गरजू विद्यार्थ्यांसाठी एक हात मदतीचा या उपक्रमा अंतर्गत शैक्षणिक साहित्याचे वाटप करत असून यावर्षी प्रतिष्ठानच्या वतीने बीड जिल्ह्यातील दीडशे शाळांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करणार असल्याचे सांगितले.

एक हात मदतीचा या उपक्रमार्तगत गांधीनगर शाळेने प्रतिष्ठानास आर्थिक मदत केली. अध्यक्षीय स्थानावरून बोलताना पोलीस निरीक्षक मुदीराज यांनी शालेय विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे अभिनंदन केले व जिल्हा परिषदेच्या शाळा गुणवत्तापूर्वक व संस्कारक्षम शिक्षण देऊन विद्यार्थ्यांना सर्वांगीण विकास करतात असे सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शेख हुजीर यांनी केले. प्रास्ताविक खाडे फुलचंद यांनी केले. स्वागतगीत व अतिथिंचा सत्कार श्रीमती वर्षा कोरडे व पठाण मॅडम यांनी केले. शालेय उपक्रमांची माहिती श्रीमती नंदागौळी व श्रीमती देवगुडे मॅडम यांनी दिली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती सुरेखा बोंदर यांनी मार्गदर्शन केले.

# वृक्षतोडीकडे जिल्हा प्रशासनाचे दुर्लक्ष

## जिल्हाधिकारी कार्यालयातील सागवानाचे झाड तोडले ; निषेधार्थ वृक्षप्रेमीकडुन श्रद्धांजली अर्पण:- डॉ.गणेश ढवळे

बीड:- संपूर्ण मराठवाड्यात बीड जिल्ह्यात २.४ इतके कमी वनक्षेत्र असुन निसर्गाचा समतोल राखण्यासाठी ३३ टक्के वनक्षेत्र अपेक्षित आहे.वनक्षेत्र कमी असल्याने बीड जिल्ह्यात वारंवार दुष्काळाचे संकट येत आहे.वनक्षेत्र आणि हरितक्षेत्र वाढविण्यासाठी जिल्हा प्रशासन ठोस भूमिका घेत नसल्याचे दिसून येते.नगररोड वरील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारातील संरक्षक भिंतीच्या आतील रस्ता कामास कोणताही अडथळा न करणा-या १५ वर्षे वयोमान असणाऱ्या सागवानाच्या झाडाची काल दि.७ रविवार रोजी आर्थिक लाभापोटी कत्तल करण्यात आली.शासकीय कार्यालयाच्या जिल्हाधिकारी नगरपालिका, सार्वजनिक बांधकाम , राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, वनविभाग आदि.विभागाची परवानगी न घेताच वृक्षतोड करण्यात आली असुन संबंधित प्रकरणात गुन्हे दाखल करण्यात यावेत यासाठी वृक्षतोड प्रकरणात कठोर कारवाई करण्यात यावी यासाठी मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार




प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे, शेख युनुस, रामनाथ खोड,शेख मुबीन,शेख मुस्तफा यांनी निष्क्रीय जिल्हा प्रशासनाला श्रद्धांजली अर्पण करत निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांना निवेदन देण्यात आले. याचवेळी वृक्षतोड करून आंदोलनकर्ते यांचा निवारा हिरावून घेणा-या जिल्हा प्रशासनाने निवारा शेड उपलब्ध करून देण्यात यावा अशी मागणी करण्यात आली.

बीड जिल्ह्यात वृक्षतोड बंदी असतानाही वनविभागातील अधिकारी आणि कर्मचारी यांच्या संगनमताने मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड होत असुन पुराव्यानिशी लेखी तक्रार केल्यानंतर कारवाई होत नाही बीड तालुक्यातील कानडीघाट येथे ५० वर्षे वयोमान असणाऱ्या १५ वृक्षांची अवैध वृक्षतोड प्रकरणात लेखी तक्रार तसेच आंदोलनानंतर सुद्धा वनविभागाने केवळ स्थळपंचनामा केला आणि वृक्षतोड करणारांशी आर्थिक संगनमत करून ठोस कारवाई केली नाही या घटनेला वर्षं उलटले असुन संबंधित प्रकरणात कारवाईस टाळाटाळ करणाऱ्या वनविभागातील जबाबदार अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी.

### आंदोलकांसाठी निवारा शेड उपलब्ध करा


जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सामाजिक कार्यकर्ते, नागरिक संघटना तसेच पिडीत विविध मागण्यांना घेऊन न्याय हक्कांसाठी लोकशाही मार्गाने आंदोलने, निदर्शने, उपोषणे करतात.प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे काही आंदोलने आठवडाभर तर काही त्यापेक्षाही जास्त दिवस चालतात.सध्या रस्ता रूंदीकरणाच्या कामासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड करण्यात आली असून आंदोलकांचा निवारा हिरावला असुन उन्हाळ्यात आणि पावसाळ्यात त्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे त्यामुळे निवारा शेड उपलब्ध करून देण्यात यावे.

## माझी लाडकी बहिण योजनेत बीड जिल्हयातील अर्ज ऑफलाइन पद्धतीने स्वीकार करुन महिलांची आर्थिक लुट थांबवा - आकाश सोनवणे

**बीड /वार्ताहर!**

**राज्य सरकारने चालू केलेली माझी लाडकी बहिण योजनेची अंमलबजावणी करतांना सेतु केंद्र, ऑनलाईन दुकानात आलेल्या महिलांना कागदपत्रे, नियम अटी दाखवुन ३००,४००, रुपयांची लुट करण्यात येत आहे त्यामुळे प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन कारवाई करुन सेतु केंद्र, ऑनलाईन दुकानांवर कारवाई करावे व बीड जिल्ह्यातील अर्ज ऑफलाईन पद्धतीने स्वीकार करावे अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे युवा नेते आकाश सोनवणे यांनी मुख्यमंत्री यांना ईमेल द्वारे केली आहे.**

सरकारने सुरू केलेल्या ’माझी लाडकी बहिण योजनेची दुरूस्ती करून ऑनलाईन अर्ज दाखल करण्याची तारीख १५ जुलै ऐवजी ३१ ऑगस्ट २०२४ करण्यात आली आहे तसेच योजनेची ५



एक्करची अट रद्द करण्यात आले आहे. महिलांची वयोमर्यादा २१वर्ष ते ६५ वर्ष करण्यात आले आहे तसेच ज्या कुटुंबाकडे पिवळे किंवा केसरी राशन कार्ड असेल त्यांना उत्पन्नाच्या प्रमाणपत्रातुन सुट देण्यात आली आहे व डोमेसाईल सर्टिफिकेट (अधिवास प्रमाणपत्र) ची अट रद्द करण्यात आली आहे त्यामुळे सर्व महिलांनी माझी लाडकी बहिण योजनेचा लाभ घ्यावा तसेच प्रशासनाने सेतु केंद्र, ऑनलाईन दुकानांवर तक्रारी भेटल्यास तात्काळ दखल घेऊन कारवाई करावे अशी मागणी.राष्ट्रवादी कॉंग्रेसचे युवा नेते आकाश सोनवणे यांनी मुख्यमंत्री यांना ईमेल द्वारे केली आहे.

## पोलीस अधिकाऱ्यांना रॉंगसाईडने येऊन उडवणाऱ्याची CID च्यामार्फत चौकशी व्हावी-रविंद्र शिनगारे

जिल्ह्यासह राज्यातील पोलीस दलात हळहळ व्यक्त करणारी घटना सात जुलै रोजी सकाळी आपले कर्तव्य बजावण्यासाठी पोलीस भरतीच्या परीक्षे बंदोबस्तासाठी पोलीस उपनिरीक्षक मच्छिंद्र नन्नवरे आणि पीएसआय रमेश नागरगोजे हे दोघे दुचाकी चक २३.९३९७ वरून नेकनूर मार्गे बीड कडे निघाले असता नेकनूर नजीक कालिका मंगल कार्यालयासमोरून जाताना नेकनूर कडे जाणारी चार चाकी कार ने रॉंगसाईडने येऊन पोलीस अधिकाऱ्यांना उडवले.ही कार समोर मोकळा रस्ता असताना सुद्धा साईट बदलून रॉंग साईड मध्ये घुसत पोलीस अधिकाऱ्यास उडवले असे स्पष्ट फुटेज कालिका मंगल कार्यालयातील कॅमेऱ्यात कैद झाले असून ते फुटेज पाहता स्पष्ट जाणून बुजून उडवल्याचे दिसत



आहे सदर वाहन चालक घटनास्थळावरून फरार झालेला असून त्याची सीआयडी च्या माध्यमातून चौकशी व्हावी तसेच कर्तव्यावर जाताना शहीद झालेल्या अधिकाऱ्याच्या.वारसांना शासनाने तात्काळ एक कोटीची मदत व एकाला शासकीय सेवेत घेण्याची तरतूद नसली तरी विशेष बाब म्हणून सामावून घेण्यात यावे.तसेचअनुकंप सूचीतील नावबदलण्याची तरतूद करून जीआर काढावा.आणि गंभीर जखमी झालेल्या पोलीस अधिकाऱ्यास ५० लाखाची मदत करावी.अशी मागणी पोलीस परिवारासह पोलीस बॉईज असोसिएशन महाराष्ट्र राज्याच्या प्रदेशाध्यक्ष रविंद्र शिनगारे .यांनी प्रसिद्धी पत्रकाच्या माध्यमातून केली आहे.



## नांदा येथे मंगळवारी म्हसोबाची यात्रा

आष्टी /प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील नांदा येथील जागृत देवस्थान म्हसोबा महाराज या देवाची यात्रा मंगळवार दिनांक ९ जुलै २०२४ रोजी आहे. या यात्रेनिमित्त छबिना मिरवणूक काढण्यात येते तसेच आतसबाजी , लेझीम पथक आदी कार्यक्रम असतात .त्याचप्रमाणे आईसाहेब जागरण गोंधळाचा कार्यक्रम या यात्रेनिमित्त ठेवण्यात आलेला आहे.परिसरातील भाविक भक्तानी या यात्रेस मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन किरण भाऊ जावळे मित्र मंडळाच्या वतीने व नांदा यात्रा कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT